ISSN : 2454-7905
MAH/NAN/10936/2015
SJIF 2023 - Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 9, Vol. I, Issue- LXXXVII, September-2023

- Cheif Editor -

**Pallavi Laxman Shete**

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Fa

साधाच. स्त्रियांचा पोशाख मात्र रंगीबेरंगी. चोळी शिवायची असेल तर तिला वेगवेगळे कलर. त्या चोळीला झालर. तीही वेगळ्या रंगाची .त्यावर तितरी तेही पैशाची नाणी. त्यामुळे चोळी ही उठावदार आणि असायची. लेंगाही तसाच. लेंगा नऊ मीटरचा कापडाचा. दोन रंग असलेला. लेंगाच्या वरच्या बाजूला लेपो. बाजूला झालर अशा पद्धतीने सजविलेला असायचा. परंतु आज चोळी लेंगाच्या ठिकाणी साडी परकर आहे. त्यांच् अस्तित्व केवळ चित्रपटसृष्टीतच किंवा सण-उत्सवालाच दिसते. आज तांडात केवळ वयोवृद्ध हा पोशाख आढळतो. म्हणून ती स्त्री आज चटकन नजरेत भरते. ओळखू येते. आज हा पोशाख वंद मार्गावर आहे. त्या ठिकाणी साडी सलवारने जागा घेतलेली आहे . आज या समाजाचा व्यक्ती किंवा बाई येत नाही. अशी सुंदर पोशाख असलेली संस्कृती केवळ चित्रपट आणि विशिष्ट उत्सवाप्रसंगीच दिसून येते. नाही.

एकंदरीत वंजारा समाजाची लोकसंस्कृती फार सुंदर आहे. ती प्राचीन आहे. या समाजातील विवाह पद्धती, उत्सव, भाषा, पोशाख या बाबी इतर समाजाच्या संपर्काने आणि जागतिकीकरणामुळे फारच परिवर्तनीय दिसून येतात. ही संस्कृती टिकवायची असेल तर देश पातळीवर या संस्कृतीचा अभ्यास होणे गरजेचे आहे. मोठ्या प्रमाणात देशात हा समाज आहे. या समाजाची आणि भाषेची दखल घेतली जात नाही ही आजची मोठी शोकांतिका. इतर संस्कृती आणि संक्रमणाने हा भोळाभाबडा समाज आपली संस्कृती विसरत चाललेला म्हणून देशपातळीवर या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन झाले तरच ती जिवंत राहील. अन्यथा तिला कळा आल्याशिवाय राहणार नाही.

संदर्भसूची :-


1. बंजारा लोकजीवन पद्धती - डॉ रुक्मिणी पवार.
2. बंजारा समाज, संस्कृती आणि स्त्री . डॉ. लक्ष्मण पवार
3. बनजारा जनजाति का इतिहास - डॉ यशवंत जाधव.
4. बंजारा लोकांचा इतिहास - -बळीराम पाटील.

विवाहासारखा विधी करताना कोणकोणत्या घटकांना प्राधान्य देण्यात आलेले आहे यांचा तपशीलवार अभ्यास करण्याची गरज आहे. विवाह संबंध जुळण्यापूर्वी बंजारा समाजातील लोक जाती व कुळ इत्यादींचा सूक्ष्मपणे विचार करीत असे. एकाच कुळातील व्यक्तींसोबत लग्न होत नव्हते. सगोत्र विवाहला विरोध होता. ही संस्कृती आज शिल्लक नाही. गोत्र सोडाच पण आज इतर धर्माच्या मुला-मुलींबरोबर या समाजाची मुले लग्न करताना दिसत आहे. त्यामुळे संस्कृतीचा ऱ्हासच होत चाललेला दिसून येतो. या समाजात पूर्वी बालविवाह होत नव्हते. मुलगी हुशार झाली हे आजी, आई सांगायची तरच विवाह होत असे. या गोष्टी कलियुगात राहिलेल्या नाहीत.

**भाषिक वेगळेपण :-**

इंग्रजांच्या आगमनाने देशात वेगवेगळे बदल घडत होते. या समाजाची भाषा ही राजस्थानी. हिंदी मिश्रित होती. भाषा बोलण्यासाठी सोपी. सहज कळणार. ती आजही तशीच आहे. गुन्हेगारी जमातीचा कायदा लागू झाल्यानंतर हा समाज जीव वाचविण्यासाठी रानोमाळ भटकत राहिला होता. त्याठिकाणी जे मिळेल ते खाऊन उपजीविका करीत होता. आपण काय बोलतो हे लोकांना कळू नये, म्हणून त्यांनी त्यांची स्वतंत्र भाषा निर्माण केली. इतर लोकांपासून संरक्षण होणे हेच या भाषेचे मुख्य कारण होते. हा हेतू समोर ठेवून भाषेबरोबर संस्कृतीही निर्माण केली. या भाषेचा फायदा घेऊन समाजातील लोकांनी केवळ भारतातच नव्हे तर युरोपातही आणि जगभर प्रवास करून त्या त्या देशात विसावले. त्यांना त्या ठिकाणी वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात. परंतु भाषा मात्र संपूर्ण जगात एकच बोलली जात आहे आणि ती राहणारी आहे. आज इतर समाजाच्या संपर्काने आणि शिक्षणामुळे या भाषिक लोकांत अमुलाग्र बदल झालेला आहे शिकलेली माणसे घराबाहेर आणि घरात बंजारा भाषा फारच कमी प्रमाणात. त्यांना ती गावंढळ लोकांची भाषा वाटते. परंतु भाषेत एवढे सामर्थ्य आहे की एक भाषा बोलणारे दोन व्यक्ती जेव्हा परप्रांतात एकत्र येतात तेव्हा त्यामध्ये जो जिव्हाळा निर्माण होतो, त्यांचे वर्णन करता येत नाही. अशी ही सुंदर भाषा बोलण्यासाठी का बरे कमीपणा वाटावा. हा एक चिंतनाचा विषय आहे. त्याकाळी भाषेवरून हा समाज एकत्र यायचा. तांड्यात इतर समाजाची घरे नसायची पण आज तसे राहिलेले नाही. बंजारा व्यक्ती ही आपली भाषा बोलताना अडखळत आहे इतर भाषेवर त्यांचा अधिक जोर असतो ती आपली प्रतिष्ठा समजतात. परिणामी आज या समाजातील व्यक्ती ओळखता येत नाही. ही भाषा बोलू लागले की आपुलकी निर्माण व्हायची. आपुलकीने 'आपळो मणक्या' म्हणून ओळख करून द्यायचे. आज या समाजातील व्यक्तीच भाषेवर प्रेम दाखवीत नसल्यामुळे भाषिक सौंदर्य नष्ट होत आहे असे वाटते. आज त्यांच्यामध्ये जिव्हाळा निर्माण न होता ती माणसे एकमेकापासून दूर जात आहे. म्हणून भाषा टिकवायची असेल तर ही भाषिक संस्कृती अबाधित राहिली पाहिजे आणि दोन व्यक्ती मधील संवाद वाढले तरच भाषा टिकू शकेल.

**बंजारा समाजाचा पोशाख :-**

हा समाज पूर्वी आपले संघटन समाज सातत्यसंस्कृती संवर्धन आणि इतर समाजापेक्षा स्वतःच्या समाजाचे वेगळेपण जपण्यासाठी प्रयत्न करीत होता. म्हणूनच भाषेबरोबर आपल्या रूढी प्रथा, परंपरा, सण -उत्सव साजरे करण्याची पद्धत आणि त्याबरोबर आगळावेगळा पोशाख. या सर्व बाबी त्यांनी स्वतंत्रपणे निर्माण केलेल्या आहेत. या सर्वांच्या अस्तित्वातही तांड्यात डोकावते या समाजाची पोशाख संस्कृती ही उल्लेखनीय स्वरूपाची आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्री आणि पुरुष यांचा पोशाख वेगळा केला म्हणून या समाजातील लोक चटकन कापडावरून ओळखू येतात. पुरुषांना पांढरा शर्ट, पांढरी धोती आणिस्त्रियांना काचळी, लेंगा तोही नऊ मीटरचा. पुरुषांचा

दिवाळी उत्सवांच्या बाबतीतही केवळ वेगळे सांगायची गरज नाही. पूर्वी दिवाळी आली म्हणायचे ते दोन जोदरच. या सणातील गोधन पूजा उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. दिवाळीचा पहिला दिवस 'लक्ष्मीपूजन' बंजारा 'काळीमावस' असे म्हणतात. या दिवशी घरातल्या अंगणात दिवे लागत. परंतु गाईच्या गोठ्यातही लायचे. पूर्वी यांच्याकडे भरपूर गुरेढोरे असायचे. घरादारात दूध तुपांचा चंगळवाद असायचा. गरीब श्रीमंती नव्हता. ज्यांच्याकडे गायची संख्या अधिक तो श्रीमंत असे ब्रीद असायचे. या दिवशी गायींची मनोभावे पूजा करे परंतु आज त्या सर्व गोष्टी होताना दिसत नाहीत. अंगणातील गाई बैलांची संस्कृती नष्ट होऊन त्रिकरणामुळे आज ट्रॅक्टर संस्कृती आलेली दिसते. त्यामुळे काळी मावस्येला गाईला दिवा लावायलाही काही नाहीत. केवळ ती संस्कृतीच होती म्हणायची वेळ आली आहे. आज या समाजातील शिकलेल्या लोकांनी ही खूप छान होती असे म्हणायची वेळ आलेली आहे. अलीकडच्या काळातील मुला मुलींना तर ही संस्कृती काय माहीत नाही आणि या संस्कृतीवर संशोधनही झालेले नसल्यामुळे पुस्तक रूपाने ती लोकांसमोर आलेली केवळ बोटाच्या हातावर मोजण्याएवढ्या समाजातील लेखकांनी संशोधन केले आहे परंतु तेही संशोधन लोकांच्या नजरेत पडताना दिसत नाही. त्यावर कोणी समीक्षा करायला तयार नाहीत. केवळ पुस्तक बंद अशी कृती दिसते. म्हणून ही संस्कृती आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे असे सांगता येईल.

या दिवशी ग्रामदेवतेला प्रसन्न करण्यासाठी ते बळीप्रथा विधी पार पाडत असे. त्यामुळे तांडात एक एकोपा असायचा. प्रत्येकाला मटणाचा वाटा मिळायचा. ही पद्धत आज बंद झालेले दिसते. त्या पद्धतीमुळे गरीब असो की श्रीमंत प्रत्येकाच्या घरात एकाच प्रकारची जेवण असायचे. त्यानिमित्ताने आपण सर्व एक आहोत याची सतत जाणीव होत असायची आणि ही तांडा संस्कृती अबाधित राहायची.

पूर्वीच्याकाळी ही लोकसंस्कृती अबाधित होती. आज काही ठिकाणी या प्रसंगाने लोकसंस्कृती दर्शन होते. परंतु त्यात जीव नसल्यासारखेच. ती पवित्र आणि एकोपा निर्माण करणारी संस्कृती आज नष्ठ झाल्यासारखीचं आहे.

**विवाह संस्कृती :**

बंजारा समाजात प्राचीन काळी निश्चित केलेल्या तारखेपूर्वीच नवरदेव नवरीच्या घरी सहा महिने आधीच राहण्यासाठी येत असतात. या काळात नवरी आपल्या आई-वडिलाकडे न राहता आजोळी राहत असे. नवरदेव त्या काळात सासरवाडीत व्यायाम, सकस आहार घेत असे. आग्रहाने ते खाऊ घालायचे अर्थात, ही या समाजाची संस्कृती होती. त्यात प्रेमाचा स्पर्श अधिक होता. आता नाही असे नाही आताही आहे. परंतु सहा महिने आधी तिथे राहायची ही संस्कृती बंद झालेली आहे. त्याठिकाणी आता मोबाईल संस्कृती आलेली आहे. त्यानंतर लग्न सोहळा

'तीन' दिवस चालायचा पूर्वी या समाजात हुंडा पद्धती नव्हती. हुंडा हा मुलींच्या वडिलालाच द्यावा लागायचा . अशी सुंदर संस्कृती मात्र आज संपलीआणि आज त्याठिकाणी हुंडा मुलांना द्यावा लागतो. इतर लोकांच्या संपर्कामुळे हुंडा पद्धत फार वाढलेली दिसते या पद्धतीमुळे कधी कधी मुलींच्या वडिलांची दयनीयअवस्था झालेली असते. अतिशय घाणेरडी ही पद्धत या समाजात सुरू झालेली आहे. जोपर्यंत ही पद्धत असेल तोपर्यंत या समाजाची संस्कृती अधोगतीकडे गेल्याशिवाय राहणार नाही. पूर्वीच्याकाळी एका एका घरात पाच पाच मुली असायच्या त्यामुळे आम्ही श्रीमंत आहोत असे मुलींचा बाप म्हणायचा. परिणामी सोयरीकी तुटायच्या नाहीत आणि आत्महत्याही व्हायच्या नाहीत. अशी ही पावित्र्य जोपासणारी संस्कृती नष्ठ होऊन, समाजात विकृत सांस्कृति तयार झालेली आहे. या संस्कृतीच्या संदर्भात डॉ. रुक्मिणी पवार यांचे मत उल्लेखनीय आहे. त्यांच्या मतानुसार

महत्त्वपूर्ण अंग आहे. समाजासाठी प्रत्येक व्यक्ती जीवनाला दोनच दिवसाचा खेळ समजतो. या संस्कृतीच्या वारसदार स्त्री पुरुष दोघेही आहेतच परंतु आज मात्र जागतिकीकरणामुळे केवळ तांड्यातच स्त्री-पुरुष एकत्र येऊन उत्सव साजरे करतात. त्या तुलनेत या समाजातील लोकांनी शहरात मात्र संस्कृती संवर्धनाचे कार्य पुरेशा प्रमाणात करतात असे नाही. या सण उत्सवात वयोवृद्ध स्त्रियांचा सहभाग अधिक असतो. आपल्या समाजातील संस्कार टिकले पाहिजे हा अट्टाहास त्यांचा असतो. म्हणून जाणीवपूर्वक सण उत्सवाच्या निमित्ताने अबोला असणारी स्त्री संस्कृतीचे संवर्धन करताना दिसते. परंतु अलीकडच्या तरुण स्त्री-पुरुषांचा सहभाग अल्प प्रमाणात असल्यासारखे आहे. केवळ स्त्रियांनी लोकसंस्कृती वाचविण्याचा ठेका घेतलेला आहे असे वाटते.

'नागपंचमी' सणासारखे उत्सवामध्ये तांड्याच्या व्यतिरिक्त शहरात गेलेले किंवा इतर समाजाच्या संपर्कात आलेले बंजारा बांधव उत्सवात सहभाग घेत नाहीत. त्यांना लोक काय म्हणतील यांची चिंता पडलेली असते. मनात असूनही त्यांना त्यांची लाज वाटायला लागते. नागपंचमी उत्सवात स्त्रियांची भूमिका महत्त्वाचीच परंतु पुरुषांचीही भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे. जोपर्यंत पुरुष सहभागी होत नाहीत तोपर्यंत या सणातील स्त्री एकाकी पडते. या उत्सवाला झोका पण बांधला जातो आणि तो झोका उंच असतो. त्यासाठी लागणारा लाकूड जंगलातून आणावे लागते. जर झोका बांधला नाही तर स्त्रियांच्या मनातील दडलेल्या भावना उफाळून येत नाही. मनातील भावना ती प्रत्यक्ष आई वडील, भाऊ यांच्यासमोर व्यक्त करू शकत नाही. तीच भावना ती झोका खेळताना गीताच्या माध्यमातून व्यक्त करते आणि त्यातूनच अप्रत्यक्ष संदेश घरातील मंडळींना मिळतो. त्यांच्या जीवनात काय व्यथा आणि वेदना असतील त्या समजतात म्हणून तांड्यात झोका बांधल्याच जातो आणि या संदर्भात असेही म्हटले जाते की पुढच्या वर्षी आपण झोका खेळू यावर्षी आपण दोन तरी झोके खेळून घ्यावे ही वर्तमान काळातील जीवन जगत असताना येणारी साक्ष आहे. यातूनच तांड्यातही एकमेकांविषयी प्रेम भावना जागृत होते म्हणून झोका उत्सव अत्यंत महत्त्वाचा आहे. या सणाला तांडयात तीच उत्सवाचे आयोजन करण्यात येते. हे तीच उत्सव दहा दिवस चालते.

'तीज' उत्सव म्हणजे माता जगदंबेलाच प्रसन्न करण्यासाठी केलेला हा खटाटोप. दहा दिवस या उत्सवात पावित्र्य जोपासले जाते. तांड्यात दारू पिणे बकरी कोंबडी कापणे हे प्रकार थांबतात. एका प्रकारचे मातेला प्रसन्न करण्यासाठी केलेले हे पवित्र वृत्तच आहे असे म्हणावे लागेल. त्यामुळे तांडा जिवंत ठेवल्या जातो. आजही कुठे कुठे ही प्रथा अबाधित आहेत परंतु आज जागतिकीकरणामुळे समाजातील तांडा आणि शहरात आणि गावात गेलेल्या लोकांनाही आपली लोकसंस्कृती टिकावी वाटत नाही. त्याविषयी समाजाची फार मोठी खंत आहे. समाजातील काही संघटना ही संस्कृती टिकली पाहिजे यासाठी प्रयत्नशील असतात. म्हणून क्वचितच एखाद्या मोठ्या शहरात 'तीज' उत्सव साजरा करण्यात येतो. त्यांच्या आयोजन करण्यात आलेले असते.

पूर्वी हा उत्सव साजरा करण्यामध्ये सर्व ग्रामदेवतांना प्रसन्नच करणे असा होता. त्यामुळे त्याकाळी तांडात सर्व गोष्टींचा चंगळ वाद होता. आज हे उत्सव, परंपरा बंद तर पडत चालले परंतु यावर सुशिक्षित शिकलेली लोक लिखाणही करत नाहीत किंवा इतर समाजातील लेखकांनी यावर विचारही केलेले दिसत नाही. त्यावर लिहिताना दिसत नाहीत. हे फार मोठे दुःख आणि दुर्दैवी आहे. या सण उत्सवांच्या परंपरा आबादीत ठेवायचे असतील तर शिकलेल्या सर्व समाजातील लेखकांनी या लोकसंस्कृतीचे दर्शन इतरांना घडून दिले पाहिजे. तरच ही अनमोल उत्सवांची संस्कृती टिकेल.